## प्रेसनोट दि. ०१/०९/२०१८

# विमाननगर येथील लॉजवर छापा
## २ सज्ञान पिडीत मुलींची वेश्या व्यवसायतुन सुटका
## एजंट अटकेत

दि.३१/०८/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, .गुन्हे शाखेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, यांना पोलीस नाईक तुषार आल्हाट व प्रदिप शेलार यांचे कडुन माहीती मिळाली की, विमाननगर चौक पुणे नगर रोड पुणे येथील लॉज मध्ये इसम नामे मिकेशकुमार लुहार व त्याची साथीदार कल्पना थोरात हे महिलांना वेश्या व्यवसायासाठी प्राप्त करुन घेवुन त्यांना पैशाचे अमिष दाखवुन त्यांचे कडुन वेश्याव्यवसाय करवुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली, त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे व त्यांचे विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच येरवडा पोलीस स्टेशनकडील सहा.पोलीस निरीक्षक श्री.जी.जी.मोरे यांनी संयुक्त कारवाई करुन विमाननगर चौक पुणे नगर रोड पुणे येथे चालत असलेल्या लॉजवर वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान १ बिहार व १ उत्तरप्रदेश राज्यातील सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणारा १) मिकेशकुमार वसंतभाई लुहार वय ३३ वर्षे रा. राजश्री कॉलनी, निरामय हॉस्पीटल जवळ, गणेश नगर, वडगाव शेरी पुणे मुळगाव अविरभाव सोसायटी, चिकुवाडीजवळ, पांडेसरा,सुरत गुजरात राज्य, २) कल्पना विकास थोरात, वय ३० वर्षे रा.महागणेश नगरी सोसायटी डी/२०१, मांजरी रोड, केशवनगर पुणे ३) लॉज मालक फिरोज मुकेरी याचे विरुध्द येरवडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ५८७/२०१८ इटपा कायदा कलम ३,४,५ सह भादंवि कलम ३७० व ३७०अ (२), ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाईच्या वेळी आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. ९०००/- रुपये, २ मोबाईल फोन व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. शिरिष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती मनिषा झेंडे, पोउनि आनंत व्यवहारे, तुषार आल्हाट, प्रदिप शेलार, राजाराम घोगरे, नामदेव शेलार, रमेश लोहकरे, नितीन तरटे, नितीन तेलंगे, सुनील नाईक, सचिन कदम,रेवनसिध्द नरोटे, राजेद्र कचरे, गीतांजली जाधव, रुपाली चांदगुडे, यांनी व येरवडा पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस निरीक्षक श्री.जी.जी.मोरे व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.